# विद्यार्थीकेंद्रीत विद्यापीठ करणार - प्रा.डॉ. दिलीप मालखेडे

## विद्यापीठात कुलगुरू पदाचा कार्यभार हस्तांतरण कार्यक्रम संपन्न

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थीकेंद्रीत करण्याचा माझा मानस असून त्यादृष्टीने विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढावे, विद्यार्थ्यांना संशोधन व शिक्षणपूरक जास्तीतजास्त सुविधा मिळाव्या, यासोबतच विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून नवनिर्मिती करण्यासाठी प्रेरित करण्याचा मानस नवनियुक्त कुलगुरू प्रा.डॉ. दिलीप मालखेडे यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचे आठवे कुलगुरू म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी यांनी डॉ. मालखेडे यांची निवड केली. आज त्यांनी कुलगुरू पदाचा पदभार विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले यांचेकडून स्विकारला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे मावळते प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले, मावळते प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख उपस्थित होते.

विद्यमान कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे संबोधन करतांना पुढे म्हणाले, विद्यापीठात दरवर्षी जवळपास पाच लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात, यावरुनच विद्यापीठाचे कार्यक्षेत्र किती मोठे असल्याची प्रचिती होत असून या विद्यापीठाचा कुलगुरू होणे माझ्या जीवनातील अतिशय आनंदाचा क्षण आहे. प्रत्येक विद्यापीठाचे व्हिजन, मिशन व ध्येय पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व इतर घटकांची यांची भूमिका महत्वाची असते. विद्यापीठातील मागील सात कुलगुरूंचा मी आदर करतो की, त्यांनी विद्यापीठाची विकासात्मक प्रगती करुन विद्यापीठाचे नावलौकिक केले.

ते पुढे म्हणाले, आजच्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थी-विद्यार्थी, विद्यार्थी-शिक्षक व शिक्षक-शिक्षक यामध्ये मैत्री असणे आवश्यक असून त्या माध्यमातून विद्यार्थी कुठल्याही परिस्थितीवर मात करु शकतो. विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाबरोबरच तंत्रज्ञान विकास महत्वाचा असून त्या माध्यमातूनच विद्यार्थी घडत असतो. आपल्याला विद्यापीठात काम करण्याची संधी ही केवळ विद्यार्थ्यांची व पर्यायाने समाजाची सेवा करण्यासाठीच मिळाल्याची भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

स्वागतपर भाषण करतांना मावळते प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले म्हणाले, डॉ. मालखेडे आज विद्यापीठात रुजू झाले, हा विद्यापीठासाठी आनंदाचा क्षण असून त्यांना पदभार देतांना मला अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदू असून तो चांगला घडावा व त्याची दिवसेंदिवस प्रगती व्हावी, असा विद्यापीठाचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे.

ते पुढे म्हणाले, विद्यापीठाचा सर्वांगीण विकास करण्यासाठीच आपण सर्वजण एकत्रित काम करीत असून त्याकरिता मला प्र- कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विविध प्राधिकारणींचे सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. विद्यापीठाला आता डॉ. मालखेडे यांच्यासारखे सक्षम नेतृत्व लाभले असून, त्यांच्या माध्यमातून विद्यापीठाची विकासात्मक प्रगती होईल, अशी आशा व्यक्त करुन त्यांनी डॉ. मालखेडे यांना पुढील कार्यकाळाकरिता शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले यांनी कुलगुरू पदाचा कार्यभार नियुक्त कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांना हस्तांतरित करुन त्यांचा शाल, श्रीफळ व पुस्तक देवून सत्कार केला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने करण्यात आली. कार्यक्रमप्रसंगी कुलसचिव यांनी विद्यापीठाचे मावळते प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले व मावळते प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांचा शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुस्तक देवून विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. नियुक्त कुलगुरूंचा परिचय व प्रास्ताविकतेतून कार्यक्रमामागील भूमिका कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी मांडली. संचालन उपकुलसचिव डॉ.डी.आर. चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, विविध प्राधिकारणींची सदस्य, अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी तसेच डॉ. मालखेडे यांचे कुटुंबीय आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,  
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी  
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**  
दि. १६/०९/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ.डी.आर. चव्हाण)**  
प्र. जनसंपर्क अधिकारी